**सत्र खटला क्र. १२/२०२४ मधील फौजदारी जामीन अर्ज**

**महाराष्ट्र शासन**
**वि.**
**संतोष मदन थोरवे + १**
**(CNR NO. MHBU20-000150-2024)**

## नि.क्र. ८ खाली आदेश
**(पारीत दिनांक १८ मार्च २०२५)**

०१] अर्जदार – **संतोष मदन थोरवे** याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३९ अन्वये पोलीस ठाणे, लोणार येथील अपराध क्र. ३३८/२०२३, कलम ३०२, २०१ सह कलम ३४ भारतीय दंड विधान, खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०२] अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादी गजानन जायभाये याने पोलीस ठाणे, लोणार येथे रिपोर्ट दिला की, दिनांक २८.१०.२०२३ रोजी सायंकाळी ०५.०० वाजताच्या सुमारास त्याचा मुलगा नामे राजाराम जायभाये याने त्याला तो संतोष मदन थोरवे याचे शेतात ट्रॅक्टर घेऊन पंजी करण्यास जात आहे असे सांगून घरुन गेला. परंतु त्या दिवशी रात्री त्याचा मुलगा राजाराम घरी परत आला नाही.

०३] दिनांक २९.१०.२०२३ रोजी फिर्यादीच्या गावचे तंटामुक्ती अध्यक्ष रमेश थोरवे याने फिर्यादीला सांगितले की, त्याचा मुलगा संतोष थोरवे हा शेतात कुटाराचे गंजावर मृत अवस्थेत पडलेला आहे. या माहितीवरून फिर्यादी घटनास्थळी पोहोचला असता त्याचा मुलगा राजाराम तेथे मृत अवस्थेत पडलेला दिसला. तसेच मृतक राजाराम याचे नाकातून रक्त येत होते व गळ्यावर गळा दाबण्याचे व्रण होते. दिनांक २८.१०.२०२३ चे सायंकाळी ०५.०० ते दिनांक २९.१०.२०२३ रोजीची सकाळी ०७.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादीचे गावातील संतोष थोरवे यानेच त्याची सुन सुरेखा राजाराम जायभाये हिचेसोबत असलेल्या अनैतिक संबंधात अडसर येत असल्याने फिर्यादीच्या मुलाला गट नं. १६७ मध्ये गळा दाबून जिवाने ठार मारले. तपासादरम्यान आरोपी क्र. १ संतोष थोरवे याचा कबूली जबाबावरून

अर्जदार / आरोपी क्र. २ याला या गुन्ह्यात पकडण्यात आले. फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस ठाणे, लोणार येथे अपराध क्र. ३३८/२०२३ कलम ३०२, २०१ सह कलम ३४ अन्वये दोन्ही आरोपींविरूद्ध गुन्हा नोंदवण्यात आला.

०४] अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदाराचे विद्वान विधिज्ञ श्री. अजय दिनोदे यांनी युक्तिवाद केली की, अर्जदार हा निर्दोष असून या गुन्ह्याशी अर्जदाराचा कोणताही संबंध नाही. फिर्यादीच्या मुलाला जिवाने ठार मारून टाकण्यासाठी अर्जदाराचा कोणताही उद्देश अथवा हेतू नव्हता. फिर्यादीला अर्जदारावर संशय असल्याने त्याने अर्जदाराविरूद्ध रिपोर्ट दिला. विद्वान विधिज्ञांनी दोषारोपपत्रातील पान क्र. ९ आणि १० वर न्यायालयाचे लक्ष वेधून युक्तिवाद केला की, अर्जदाराच्या शेतात मयत राजाराम याचे प्रेत सापडल्याने त्याच्याविरूद्ध दोषारोप ठेवण्यात आले. मृतकाचा मृतदेह हा १२० फुट अंतरावर सापडला. अर्जदाराने दिलेला पोलिसांसमोरील कबुली जबाब हा ग्राह्या धरण्यासारखा नाही.

०५] मृतक राजाराम याने कधीही अर्जदाराविरूद्ध तक्रार केली नाही. मृतकाच्या पत्नीचे व अर्जदाराचे अनैतीक संबंध असल्याबाबत मृतकाने कधीही अर्जदारासोबत भांडण केले नाही. यावरून अर्जदाराविरूद्ध नोंदवलेला गुन्हा हा खोटा असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. फिर्यादी याला अर्जदार आवडत नसल्याने त्याने त्याच्याविरूद्ध खोटा आरोप करून खोटी फिर्याद दिली आहे. दोषारोपपत्रातील बयाणाचा आधार घेऊन अर्जदारातर्फे युक्तिवाद करण्यात आला की, अर्जदारानेच मृतकाला वाचवण्याचा प्रयत्न केला. अर्जदाराने साक्षीदारांना मदत मागितली परंतु कोणीही मदत न केल्याने राजाराम याचा मृत्यू झाला. या प्रकरणात बरेच साक्षीदार हे ऐकीव स्वरूपाचे असून महत्त्वपूर्ण साक्षीदारांनी दिलेले बयाण हे २ महिने उशिरा नोंदवलेले आहेत. त्यामुळे सदरचे बयाण विश्वासपात्र नाही.

०६] अर्जदार हा माहे ऑक्टोबर २०२३ पासून तुरूंगाधीन आहे. या प्रकरणातील दुसरा आरोपी जयदेव याला माननीय उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी जमानत दिलेली आहे. त्या जमानत आदेशाची प्रत दाखल करण्यात येऊन त्यातील परिच्छेद क्र. ६ कडे न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. अर्जदाराला समन्याय तत्वाच्या आधारे जमानतीवर सोडण्याची विनंती करण्यात आली. अर्जदार हा बरेच दिवसांपासून तुरूंगाधीन असून प्रकरण

निकाली लागण्यास खूप वेळ लागणार आहे. परिणामी अर्जदाराचे मुलभूत अधिकार आणि हक्क भंग पावणार आहे. अर्जदाराचे वडील हे मृत्यूशैय्येवर पडलेले असून त्यांना फुफ्फुसाचा कर्करोग झालेला आहे. त्यामुळे वडिलांच्या शेवटच्या काळात त्यांची सेवा करण्यासाठी अर्जदाराला सशर्त जामीन देण्याची विनंती करण्यात आली.

०७] याउलट, विद्वान सरकारी वकील साहेब श्री. जी. जी. पोकळे यांनी प्रस्तुत अर्जाला प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी युक्तिवाद केला की, भारतीय पुरावा कायद्याचे कलम २७ अन्वये आरोपी क्र. १/अर्जदार याचा जबाब नोंदवण्यात आला. त्या जबाबात आरोपी क्र.१ याने आरोपी क्र. २ / अर्जदार याच्यासोबत संगनमत करून राजाराम जायभाये याला जिवाने ठार मारून टाकले अशी कबूली दिली. आरोपींनी केलेला गुन्हा हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असून अर्जदारास जामीनावर सोडल्यास तो साक्षीदारांना फितूर करेल. त्यामुळे अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्यात यावा असे सरकारी वकील साहेबांनी सांगितले.

०८] दोन्ही पक्षाच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने मी अभिलेखावरील कागदपत्र, दोषारोपपत्र आणि आरोपीतर्फे दाखल करण्यात आलेले सर्व दस्तऐवजांची सुक्ष्म पाहणी केली. फिर्याद, महत्त्वपूर्ण साक्षीदारांची बयाणे व मयताची पत्नी हिचे बयाण पाहिले असता असे दिसून येते की, अर्जदार व मयताच्या पत्नीमध्ये भीती पोटी प्रेमाचे संबंध होते व त्याची जाणीव फिर्यादीला झाली होती. त्यामुळे राजाराम जायभाये याला जिवाने ठार मारण्याचा उद्देश आणि हेतू अर्जदाराकडे होता असे प्रथम दर्शनी अभिलेखावरून दिसून येते. याशिवाय मयत राजाराम याचा शवविच्छेदन अहवाल, मरणोत्तर पंचनामा आणि महत्त्वपूर्ण साक्षीदारांची बयाणे यावरून मयत राजाराम याचा गळा दाबून त्याला जिवाने ठार मारण्यात आले असल्याचे दिसून येते. परिणामी राजाराम याने औषध पिऊन आत्महत्या केली नसून त्याला जिवाने ठार मारण्यात आले असल्याचे वैद्यकीय पुराव्यानिशी प्रथम दर्शनी सिद्ध होते.

०९] तपासादरम्यान आरोपी क्र. १/अर्जदार याचे भारतीय पुरावा कायद्याचे कलम २७ नुसार जबाब नोंदवण्यात आले. या जबाबात आरोपी क्र. १ याने कबूल केले की, घटनेच्या वेळेस अर्जदार जयदेव याने राजाराम याचे पायावर बसून त्याचे दोन्ही हात घट्ट

पकडून ठेवले व त्याने हाताने राजाराम याचा गळा आवळून जिवाने ठार मारले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याचा जबाब हा भारतीय पुरावा कायद्यानुसार महत्त्वपूर्ण मानण्यात येत नाही व ग्राह्य धरता येत नाही. परंतु या जबाबाच्या अनुषंगाने जप्त करण्यात आलेला रूमाल हा जप्ती सिद्ध करण्यासाठी विचाराधीन घेता येतो. शिवाय जप्ती पंचनाम्यानुसार अर्जदाराच्या कपड्यावर आणि गुन्ह्यात वापरलेल्या रुमालावर रक्ताचे डाग मिळून आले आहे. त्यामुळे अर्जदाराचा या गुन्ह्यात प्रथम–दर्शनी सहभाग असल्याचे दिसून येते.

१०]　　या प्रकरणात फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६४ खाली महत्त्वपूर्ण साक्षीदारांची बयाणे नोंदवण्यात आली व त्यावरून असे दिसून येते की, घटनेच्या दिवशी मयत राजाराम व आरोपी / अर्जदार संतोष हे सोबत होते. यामध्ये दुमत नाही की, घटनेच्या दिवशी मयत राजाराम हा अर्जदाराच्या शेतात पंजी करण्यासाठी गेला होता. त्यामुळे अर्जदाराविद्ध 'Last Seen' चा निष्कर्ष लागू पडतो. याशिवाय महत्त्वपूर्ण साक्षीदार शालीकराम जायभाये आणि शेषराव थोरवे यांच्या बयाणावरून घटनेच्या पूर्वी मयत व दोन्ही आरोपी शेतात ट्रॅक्टरवरून नांगरणी करून उतरल्याचे त्यांना दिसले आणि त्यानंतर ते तिघेही शेतातील पत्राच्या शेडमध्ये गेले. त्यांच्या बयाणावरून असेही दिसून येते की, थोड्या वेळाने मयत राजाराम याचा ''मेलो रे संतू दा, मला मारू नको रे संतू दा'' असे म्हटल्याचे त्यांनी ऐकले. त्यामुळे कोणत्याही साक्षीदाराने अर्जदाराचे नाव घेतले नसल्याची बाब सिद्ध होत नाही. याउलट, घटनेपूर्वी अर्जदार हा मयत व मुख्य आरोपीसोबत उपस्थित असल्याचे प्रथम–दर्शनी सिद्ध होते.

११]　　अर्जदाराचे कृत्य पाहता त्याला गुन्हा करण्यासाठी कारण होते. परंतु आरोपी जयदेव याच्याकडे तसे कारण नसल्याने व त्याच्याविरूद्ध सबळ पुरावा मिळून न आल्याने माननीय उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी त्याला जामीनावर सोडले. तथापि अर्जदार व आरोपी जयदेव यांचे कृत्य पूर्णपणे भिन्न असल्याने अर्जदार सम न्याय तत्वाच्या आधारे जामीन मिळवण्यास अपात्र आहे.

१२]　　थोडक्यात गुन्ह्याचे स्वरूप, गुन्ह्यासाठी नमूद शिक्षा, अर्जदाराचे कृत्य आणि प्रकरणाची सद्य परिस्थिती पाहता अर्जदाराला जामीनावर सोडल्यास तो फरार होण्याची

शक्यता नाकारता येत नाही. तसेच अर्जदार अभियोग पक्षाच्या साक्षीदारांना फितूर करण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. म्हणून प्रस्तुत अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

नियमित जामीन अर्ज (नि.क्र. ८) नामंजूर करण्यात येतो.

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR

Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2025.03.19 17:40:48 +0530

**सागर कृ मुंगीलवार**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**ठिकाण – मेहकर**
**दिनांक – १८.०३.२०२५**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – २, मेहकर

दिनांक – १८.०३.२०२५